# भारतीय राज्यघटनेतील 106 वी घटना दुरुस्ती-नारीशक्ती वंदन अधिनियम 2023

**रेखा श्रीपाल कागे** संशोधक विद्यार्थी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड. Mobile- 8308611311

Email- shraddhapatil242@gmail.com

---

**घोषवारा**

भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. भारतामध्ये राज्यघटनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतीय राज्यघटना अंशतः लवचिक व अंशतः ताठर असल्याने कालानुरूप राज्यघटनेत बदल घडवणे क्रमप्राप्त आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम 368 नुसार घटनेच्या मूलभूत संरचनेला धक्का न पोचवता घटना दुरुस्ती करता येते. गेल्या अनेक दशकापासून महिला आरक्षण विधेयकाचा प्रश्न प्रलंबित होता. अखेरीस महिला आरक्षण कायदा 2023 लोकसभेत प्रचंड बहुमताने मंजूर झाला. विधेयकानुसार लोकसभा आणि राज्याच्या विधानसभा यामध्ये महिलांना एकूण जागेपैकी एक तृतीयांश म्हणजेच 33% जागा राखीव ठेवण्याचे निश्चित केले आहे. संबंधित कायद्याचा सविस्तर ऊहापोह केलेला आहे.

***key words** - भारतीय राज्यघटना, महिला आरक्षण

## नारीशक्ती वंदन अधिनियम

भारताला स्वातंत्र्य प्राप्त होऊन आज जवळजवळ 75 वर्षे पूर्ण झाली. राज्यघटनेतील मूलभूत अधिकारांमध्ये सगळ्यात पहिले व महत्त्वाचे तत्व समानतेचे आहे. स्वातंत्र्यपूर्व परिस्थिती लक्षात घेता आज आधुनिक काळात धर्म जाती वंश परंपरा अशा अनेक बाबतीत समानतेची तत्त्व लागू झाले असले तरी स्त्री-पुरुषांमधील भेद पूर्णपणे संपलेला नाही. स्त्रियांनी आज जवळजवळ सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने आपले कर्तृत्व सिद्ध केलेले आहे. भारतात आजही पितृसत्ताक पद्धती रूढ असल्याने राजकीय क्षेत्रात स्त्रियांचे स्थान मात्र आजही उदासीन राहिलेले होते. स्त्रियांना राजकीय आरक्षण मिळाल्याशिवाय त्यांचा राजकीय सहभाग वाढणार नाही. महिलांनी सक्रियरित्या राजकारणात प्रवेश केल्याशिवाय अनेक स्त्रीवादी प्रश्न मार्गी लागू शकत नाहीत. सदर कायद्याच्या अंमलबजावणीनंतर अनेक उत्कृष्ट महिला राजकारण्यांचा देशाच्या विकासासाठी हातभार लागू शकेल.

## * महिला आरक्षण विधेयकाचा इतिहास

1) 1987 साली पंतप्रधान राजीव गांधी यांनी मागरिट अल्वा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली व स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना राखीव जागा ठेवण्यात याव्यात असे विधेयक मांडले. ते विधेयक लोकसभेत मंजूर झाले पण राज्यसभेत नामंजूर झाले.

2) पी.व्ही. नरसिंहराव पंतप्रधान पदावर असताना 73 वी व 74 वी घटना दुरुस्ती करण्यात आली आणि पंचायत राज्य व्यवस्थेत 33 टक्के जागा राखून ठेवाव्यात अशी तरतूद केली.

3) 1996 मधील तत्कालीन पंतप्रधान देवेगौडा यांनी महिला आरक्षण विधेयक मांडले व ते चिकित्सा समितीकडे पाठवण्यात आले. पण अकरावी लोकसभा अल्पजीवी ठरल्याने ते विधेयक रद्द झाले.

4)2008 मध्ये यूपीए सरकारकडून महिला आरक्षण विधेयक मांडण्याचा प्रयत्न झाला पण सभागृहातील प्रचंड गदारोळामुळे विधेयक मंजूर होऊ शकले नाही.

5) एवढ्या कालावधीनंतर 20 सप्टेंबर 2023 रोजी मोदी सरकारने महिला आरक्षण विधेयक लोकसभेत सादर केले व ते मंजूर सुद्धा झाले.[4]

## महिला आरक्षण कायद्यानुसार झालेले बदल

1) कलम 239 (अ) मध्ये आता अतिरिक्त बदल समाविष्ट केले आहेत

* दिल्ली विधानसभेच्या जागेमध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण

* अनुसूचित जाती जमाती मधील निर्धारित जागेमध्ये एक तृतीयांश जागा महिलांसाठी आरक्षित

* ज्या जागेसाठी प्रत्यक्ष निवडणुका घेण्याची आवश्यकता आहे, त्यामध्ये एक तर तेव्हा जागा महिलांसाठी आरक्षित. अनुसूचित जाती जमातीच्या महिलांचा यामध्ये समावेश असेल.

2) कलम 330 –[अ] मध्ये आता नवीन बदल समाविष्ट केले आहेत.

* लोकसभेत महिलांसाठी एक तृतीयांश जागा म्हणजेच 33% आरक्षण

* यामध्ये अनुसूचित जाती जमाती महिला सदस्य असतील तर कलम 330(2) नुसार एकूण उपलब्ध जागेपैकी 1/3 जागेवर त्यांचा अधिकार असेल.

* प्रत्यक्ष निवडणुकीद्वारा भरल्या जाणाऱ्या जागेवर1/3 महिलांसाठी आरक्षित असतील यामध्ये सुद्धा अनुसूचित जाती जमातींच्या महिलांसाठीच्या आरक्षित असलेल्या जागांची संख्या समाविष्ट असेल.

3) कलम 332 (अ) अनुसार प्रत्येक राज्याच्या विधानसभेत महिलांसाठी जागा निश्चित केली आहे

*अनुसूचित जाती जमातीच्या स्त्रियांसाठी निश्चित केलेल्या जागांपैकी 1/3 जागेसाठी त्या हक्कदार असतील.

* प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे भरल्या जाणाऱ्या जागींपैकी 1/3 जागा महिलांसाठी असतील यामध्ये सुद्धा अनुसूचित जाती जमातीच्या महिलांसाठी आरक्षित जागा समाविष्ट असतील.

4) परिसिमनच्या कार्यवाहीनंतरच जागांचे रोटेशन होईल.
5) कायद्याची प्रत्यक्ष कार्यवाही झालेल्या तारखे पासून पंधरा वर्षानंतर हा कायदा समाप्त होईल.[7]

**प्रत्यक्ष कायद्याची कार्यवाही**

नवीन जनगणनेच्या प्रकाशन आणि परिसिमन प्रक्रियेनंतर आरक्षण लागू करण्याचा निश्चय आहे. परिसिमन म्हणजेच मतदार संघ पुनर्रचना होय. शेवटचे देशव्यापी परिसीमन 2002 मध्ये लागू झाले. सीमांकन पूर्ण झाल्यावर लोकसभा व राज्यांच्या विधानसभा विसर्जित झाल्यानंतर महिला आरक्षण लागू होण्याची शक्यता आहे.2011 मधील मागच्या जनगणनेनंतर देशाची लोकसंख्या वाढली आहे. लोकसभेतील जागा देखील त्याच प्रमाणात वाढतील. लोकसभेच्या 543 जागा जवळजवळ 210 ने वाढतील आणि एकूण संख्या 753 इतकी होण्याची शक्यता आहे.2021 मध्ये कोविड मुळे जनगणना होऊ शकली नाही आणि 2001 मध्ये झालेल्या 84 व्या घटना दुरुस्तीनुसार 2026 पर्यंत संसदेच्या जागेमध्ये बदल न करण्याचे प्रावधान आहे. कायदेशीरदृष्ट्या 2026 पूर्वी कायदेमंडळाच्या स्वरूपाला आकार देण्याच्या व्यवस्थेला आरंभ करता येत नाही. परिणामी 2026 नंतर जनगणना पूर्ण झाल्यावर येणाऱ्या आगामी निवडणुकीत म्हणजेच 2029 पासून हे विधेयक लागू होण्याची शक्यता आहे.[6]

**महिला आरक्षण विधेयकाची आवश्यकता**

या कायद्यामुळे एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात जवळजवळ 50% असलेल्या स्त्रियांचे प्रतिनिधित्व निश्चित होईल. राजकारणात महिलांचा सहभाग वाढेल महिलांच्या अनेक प्रश्न किंवा मुद्द्यांच्या बाबतीत महिलाच एक सशक्त,ग्रहणशील, रोल मॉडेल बनू शकतील. सध्या 17 व्या लोकसभेत एकूण सदस्या पैकी केवळ 15% महिला आहेत आणि विधानसभेत केवळ 9% महिला प्रतिनिधी कार्यरत आहेत. लैंगिक समानता व महिला सशक्तिकरण तत्त्वानुसार स्त्री प्रतिनिधित्वाचे प्रमाण निश्चित होण्यासाठी या विधेयकाची आवश्यकता आहे.

**महिला आरक्षणाचे फायदे / लाभ**

1) सकारात्मक राजकीय सहभाग - या कायद्यामुळे महिलांचा राजकीय सहभाग वाढवून सशक्त बनतील. देशातील महिलांचे राजकारणात कायदेशीर रित्या प्रतिनिधित्व सामील होईल. वैश्विक लैंगिक सूचकांक 2023 चा रिपोर्टनुसार 146 देशांमध्ये भारताचे स्थान 127 वे आहे. सध्या सशक्तिकरणाच्या पंधरा टक्के महिला प्रतिनिधित्व आहे.[3]
2) पंचायतीमधील सहभागाची यशस्विता -73/74 व्या पंचायतीमध्ये स्त्रियांना मिळालेल्या सकारात्मक परिणाम दिसून आल्यामुळे राष्ट्रीय स्तरावर सुद्धा हाच पॅटर्न राबवण्याची आवश्यकता दिसून येते.
3) लैंगिक संवेदनशीलता- असा एक विश्वास आहे की महिला त्यांच्याशी संबंधित मुद्द्याच्या बाबतीत अधिक ग्रहणशील व संवेदनशील असतात. या कायद्याच्या निर्मितीतून महिला संबंधित मुद्दे प्रश्न यांच्या निराकारणावर सकारात्मक प्रभाव पडेल.
4) सर्वसमावेशक अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन - युरोप खंडातील देश जसे की इत्यादींच्या आकड्यांच्या अभ्यासावरून असे लक्षात येते की महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वात वाढ झाली तसतसे त्या देशाच्या आर्थिक क्षेत्रात जो सर्व समावेशी विकासाला निर्देशित करतो.[3]

**आरक्षणाच्या विरोधात असलेली मते**

1) मोठ्या निवडणूक सुधारणापासून लक्ष विकेंद्रीत - काही विरोधकांच्या तर्कानुसार महिला आरक्षणाचा मुद्दा विविध सुधारणा उदाहरणार्थ, पक्षातील लोकतंत्र यापासून लक्ष विचलित करत आहे.
2) स्वतंत्र आणि पक्षपाती निवडणुका - विरोधकांच्या मते महिला आरक्षण पुरुष उमेदवारासाठी नुकसानदायी असू शकते. कारण आता त्यांना 2/3जागेवरच निवडणूक लढवावी लागेल.
3) महिलांची असमान स्थिती - असा तर्क दिला जात आहे महिलांची असमानता यातून स्पष्ट होईल कारण त्यांना आता गुणवत्तेच्या आधारावर निवडून न येण्याच्या रूपात पाहिले जाईल.
4) मतदारांच्या पसंतीला प्रतिबंधित करते- प्रत्येक निवडणुकीमध्ये आरक्षित जागांचे रोटेशन असल्यामुळे कोणत्याही प्रतिनिधीला त्याच्या क्षेत्रात कार्य करण्याची प्रेरणा कमी होईल कारण त्याच भागात निवडून येण्याची संधी ते गमावून बसतील.
5) विधेयक प्रभावी होण्यात विलंब - 2024 च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी हे विधेयक लागू होऊ शकत नाही कारण परिसिमन प्रक्रिया कित्येक काळापासून पूर्ण झाली नाही.
6) गैरसमान प्रयोग - हा कायदा राज्यसभा व विधानपरिषद यांच्यावर लागू नाही.
7) या महिला आरक्षणांतर्गत ओबीसी महिलांचा समावेश नाही.[3]

**निष्कर्ष**

वरील सर्व विवेचनावरून समानतेच्या तत्त्वानुसार महिला आरक्षणाचा प्रभाव देशाच्या धोरण निर्मितीमध्ये निश्चित दिसून येईल. आरक्षणांतर्गत आरक्षण आणि घराणेशाहीचे मुद्दे देखील पुढे येतील पण खुर्चीत बसल्यावर यावर नक्की तोडगा काढता येईल. महिला आणि वंचितांना उच्च दर्जाचा सन्मान, समान संधी, संसाधनातील न्याय हिस्सा, समान संपत्ती व संविधानातील समाजवादी पद्धतीने वाटा प्राप्त व्हायचा असेल तर महिला आरक्षणाचे मनापासून स्वागत केले पाहिजे. या सकारात्मक बाजू सोबतच महिलांना अनेक आव्हाने व स्वतःमध्ये देखील काही बदल घडवणे आवश्यक आहे. महिलांनी स्वयं निर्णय, स्वतःचे अधिकार आणि प्रभावी शैक्षणिक

गुणवत्ता याबाबत जागरूकता निर्माण केली पाहिजे. पुरुषप्रधान संस्कृती मधील पुरुषांच्या हातातली कटपुतली न बनता विवेक बुद्धीचा वापर व विकास करण्यास प्रवृत्त झाले पाहिजे. सरकारने सुद्धा योग्य प्रणालीचा वापर करून लवकरात लवकर महिला आरक्षण लागू करणे अत्यंत आवश्यक आहे तरच खऱ्या अर्थाने महिलांचे सशक्तिकरण होऊ शकेल.

**संदर्भ**

1. SMRITI IRANI, NARI SHAKTI VANDAN ADHINIYAM [NOV 2023] MaankibaatMinistry of information and broadcasting
2. TUSHAR CHAKRAVARTI [20 SEPT]PRS LEGISLETIVE RESERCH –INSTITUTE FOR POLICY RESERCH STUDIES
3. https://www.nextias.com/blog/%E0%A4%AE%E0%A4%B9%E0%A4%BF%E0%A4%B2%E0%A4%BE-%E0%A4%86%E0%A4%B0%E0%A4%95%E0%A5%8D%E0%A4%B7%E0%A4%A3-%E0%A4%B5%E0%A4%BF%E0%A4%A7%E0%A5%87%E0%A4%AF%E0%A4%95/
4. https://marathi.abplive.com/news/india/women-reservation-bill-today-in-parliament-special-session-histoty-and-significance-marathi-news-1211015
5. Nari Shakti VandanaAdhiniyam 2023 And Women Empowerment In India - Amar Ujala Hindi News Live - नारी शक्ति वंदन अधिनियम 2023:चुनौतियां और संभावनाएं, एक दृष्टि..! - https://www.amarujala.com/columns/blog/nari-shakhttps://www.drishtiias.com/to-the-points/Paper2/women-reservation-act-2023-women-in-politics ti-vandana-adhiniyam-2023-and-women-empowerment-in-india-2023-10-05
6. https://mahitiwala.co.in/women-reservation-bill-2023-kay-aahe/https://marathi.abplive.com/news/india/women-reservation-bill-today-in-parliament-special-session-histoty-and-significance-marathi-news-
7. https://www.scconline.com/blog/post/2023/09/29/constitution-106-amendment-act-2023-reservation-for-women-legal-news/
8. Nari Shakti Vandana Adhiniyam 2023 And Women Empowerment In India - Amar Ujala Hindi News Live - नारी शक्ति वंदन अधिनियम 2023:चुनौतियां और संभावनाएं, एक दृष्टि..! - https://www.amarujala.com/columns/blog/nari-shakti-vandana-adhiniyam-2023-and-women-empowerment-in-india-
9. https://www.drishtiias.com/to-the-points/Paper2/women-reservation-act-2023-women-in-politics
10. https://www.geeksforgeeks.org/106-amendment-act/